(१)

महाराष्ट्र शासन

क्रमांक:--एसएसएन-१०९५/५७८४/ माशि-१.
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक: १७ नोव्हेंबर, १९९५.

विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे

विषय:- नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत. [इंग्रजी माध्यम]

- - - - - - - - - - - - - - - - - -

नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयात अनुसरुन सोबतच्या विवरणपत्रात नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थांना/त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी, इंग्रजी माध्यमातून, जून १९९५ पासून कायम विनाअनुदान तत्वावर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर संस्थांनी अनुदान संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास शासनाची परवानगी देण्यांत येत आहे :-

अ] सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे [उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत] काटकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

ब] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

क] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही वा आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [इ.बी.सी. च्या ] फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांच्या सहीने लेखी हमीपत्र संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालकांनी मागवून घेऊन कायम स्वरुपाचे कागदपत्र म्हणून ते सुरक्षितपणे जतन करुन ठेवावे.

HEADMISTRESS
Smt. Kamaladevi Govindsheth Sabale
English Medium School

HEADMISTRESS
Smt. Kamaladevi Govindsheth Sabale
English Medium School, Akurdi Pune-35

३. ही परवानगी देण्यापूर्वी सदर संस्थांबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करुन घेऊन मगच त्या संस्थांना नवीन माध्यमिक शाळेची परवानगी देण्याबाबत, कार्यवाही करण्यांत यावी :-

१] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

२] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे,

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

४. याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच सदर माध्यमिक शाळेस परवानगी देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास त्वरित पाठविण्यांत यावा.

[ र.का. हुशारे ]

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत, माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना-

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

शिक्षणाधिकारी [माध्यमिक], जिल्हा परिषद.

मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

मा. मंत्री [शालेय शिक्षण] यांचे खाजगी सचिव.

मा. राज्यमंत्री [शालेय शिक्षण] यांचे खाजगी सचिव.

सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक.

निवड नस्ती, माशि-१.